पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक ०८/०६/२०१८

# वार्तापत्र

## येरमनार पुल जनतेच्या वापरासाठी खुला

- गडचिरोली पोलीस दल व भूमकाल संघटनेचा पुढाकार

पेरिमिली व येरमनार या दोन गावांना जोडणाऱ्या येरमनार पुलाचा लोकार्पण सोहळा नक्षलवादयांनी निघृण खुन केलेल्या रमेश रामटेके यांच्या पत्नी श्रीमती शकुंतला रामटेके यांचे हस्ते पार पडला. यावेळी पोलीस अधीक्षक गडचिरोली डॉ. अभिनव देशमुख, अपर पोलीस अधीक्षक अहेरी श्री. राजा आर., अपर पोलीस अधीक्षक श्री. महेंद्र पंडित, उपविभागीय पोलीस अधिकारी अहेरी श्री. गजानन टोम्पे, पोलीस उपनिरीक्षक श्री. महेश मतकर, पोलीस उपनिरीक्षक श्री. गायकवाड आणि भूमकाल संघटनेचे सचिव श्री. श्रीकांत भोवते, अविनाश सोवनी, रश्मी सोवनी आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बिरसा मुंडा, रमेश रामटेके व याच ठिकाणी पुराच्या पाण्यात वाहुन गेलेल्या नागो केये तलांडी यांच्या प्रतीमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

भूमकाल संघटनेने मागील काही दिवसांपासुन या भागातील लोकांना संघटीत करून या पुलाचे बांधकाम होणे कशाप्रकारे गरजेचे आहे हे स्थानिक नागरीकांना पटवुन दिले. परंतु या भागात कार्यतर असलेले साईनाथ व ईतर नक्षलवादयांच्या भितीपोटी कोणी गावकरी काम करण्यास धजत नव्हते. परंतु ही भिती घालविण्यात पोलीस दल व भूमकाल संघटना यांना यश आले व लोक सहभागातुन दिनांक १८/०५/२०१८ पासुन या पुलाचे बांधकाम लोक सहभागातुन व श्रमदानातुन सुरू झाले आणि अवघ्या १८ दिवसांतच १९० फुट लांबीचा व १० फुट रूंदीचा पुल परिसरातील लोकांनी केलेल्या अथक परिश्रमातुन पुर्ण झाला. विशेष बाब म्हणजे या ठिकाणी पुराच्या पाण्यात वाहुन गेलेल्या नागो तलांडी यांचे कुटूंबियांनी या पुलाचे बांधकामात सक्रिय सहभाग नोंदविला. पुलाचे काम आज पुर्ण झालेले बघुन या कुटूंबाचे अश्रु अनावर झाले होते.

या पुलाच्या बांधकामामुळे दुर्गम व अतिदुर्गम भागातील गावे एकमेकांना जोडली जावुन २० ते २५ गावांच्या नागरीकांचा दळणवळणाचा प्रश्न या पुलामुळे मार्गी लागला आहे. या पुलामुळे शाळकरी मुलांना वर्षभर पेरमिली, अहेरी, आलापल्ली व इतर शाळेत जाता येणार आहे. तसेच आजारपणाच्या काळात उपचारासाठी शहरात जाता येणार आहे.

यावेळी पार पडलेल्या कार्यक्रमात गावकऱ्यांच्या नक्षलविरोधी घोषणांनी तसेच रमेश रामटेके अमर रहे, नागो तलांडी अमर रहे अशा प्रकारच्या घोषणांनी परिसर दणाणुन निघाला होता.